१

क्र.महसूल/क-१/टे-११/शहापूर/एनएपी/एसआर-१२२/२०१३
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे
दिनांक : /०५/२०१४

22 MAY 2014

वाचले :-

१) श्री.सुधीर दत्तात्रेय तेलवणे रा.गोठेघर, ता.शहापूर, जि.ठाणे यांचा अर्ज दि.२०/०३/२०१० फेरअर्ज दि.२१/०३/२०११, दि.३०/०३/२०१३, दि.२०/०२/२०१४ व दि.२९/०३/२०१४
२) तहसिलदार, शहापूर यांचेकडील पत्र क्रमांक/महसूल/टे-४/ज.बा/वशी/५१/२०१० दि.१३/०५/२०११
३) सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे यांचेकडील जा.क्र.बिशेप/बांप/मौ.शहापूर/ता.शहापूर/ससंठाणे/१३५५ दि.०७/०६/२०१२
४) सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे यांचेकडील जा.क्र.बिशेप/बांप/मौ.शहापूर/ता.शहापूर/ससंठाणे/२३७५ दि.३०/०९/२०१३
५) भूमी संपादन, विशेष अधिकारी, विशेष घटक, ठाणे यांचेकडील जा.क्र.भूसंविअ/ नाहदा/६२४ दि.११/५/२०१०.
६) उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर ३, ठाणे यांचेकडील क्र.भूसं/मे.सें.३/ एसआर-६२ दि.३०/०४/२०१०.
७) विशेष भूसंपादन अधिकारी, उल्हास खोरे प्रकल्प, ठाणे यांचेकडील क्र.भूसं/ टे.नं.१/वशी-३१४८३/०९/२४ दि.१२/०५/२०१०.
८) उपविभागीय अधिकारी भिवंडी विभाग भिवंडी यांचेकडील क्र.बीडी/महसुल/टे-३/भुसं/कावि-४/२०१० दि.२८/०४/२०१०
९) मंडळ अधिकारी, शहापूर, ता.शहापूर यांचेकडील पत्र पत्र क्र.मं.अ.शहा/बि.प./बां.नि.क्र.९/१० दि.२६/०८/२०१०
१०)ग्रामपंचायत शहापूर, ता.शहापूर यांचेकडील दि.०४/०२/२०१० रोजीचे पत्र
११) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडील क्र.३८१८/एलसी/शहापूर/टे-१(१)/८७७ दि.१२/०२/२०१४
१२)उपकार्यकारी अभियंता, भातसा कालवा विभाग क्र. १ शहापूर यांचेकडील जा.क्र.भाकावि.१/प्रशा.२/लादा ५७७/सन २०१० दि.०१/०२/२०१०
१३)उपवनसंरक्षक शहापूर वनविभाग शहापूर यांचेकडील पत्राचा जा.क्र./ब-२८/वृक्ष/कक्ष-७/५९३/२०१३-१४ दि.०४/०५/२०१३
१४)सहाय्यक अभियंता, शहापूर उपविभाग शहापूर, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित यांचेकडील दिनांक २०/०३/२०१४ रोजीचा नाहरकत दाखला
१५)क्षतिपूर्ति बंधपत्र दि.१५/०३/२०१३
१६) दैनिक "महाराष्ट्र जनमुद्रा" प्रसिध्दी पत्रक (जाहिरनामा) दि.१०/०४/२०१०
१७) मंजुर टिपणी दिनांक २१/०४/२०१४

---

आदेश :-

ज्या अर्थी, उपोद्घातातील अ.क्र.१ अन्वये ठाणे जिल्हयातील शहापूर तालुक्यातील मौजे शहापूर येथील स.नं./ग.नं.९२/१ क्षेत्र ४१५०.०० चौ.मी. या जागेवर रहिवास प्रयोजनार्थ अकृषिक परवानगी मिळणेबाबत अर्ज सादर करण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी, या कार्यालयाने दि.१०/०४/२०१० रोजीचे दैनिक "महाराष्ट्र जनमुद्रा" या वृत्तपत्रात जाहिरात दिलेली होती. त्यावर मुदतीत कोणतीही हरकत/तक्रार उपलब्ध कागदपत्रे पाहता या कार्यालयाकडे प्राप्त झालेली दिसून येत नाही.

ज्या अर्थी, प्रस्तुत जमिनीबाबत आदिवासी हस्तांतरण कायदा/ना.ज.क.धा. कायद्याचे तरतूदीचा भंग झालेला नाही. सदरची जमीन जमिनमालक यांनी कायदेशिररित्या खरेदीने धारण केलेली आहे, असे तहसिलदार शहापूर यांचे उपोदघातातील अ.क्र.२ च्या अहवालाने कळविले आहे.

ज्या अर्थी, मौजे शहापूर, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं./ग.नं.९२/१ क्षेत्र ४१५०.०० चौ.मी. ही जागा मंजूर मुंबई महानगर प्रादेशिक योजनेमध्ये समाविष्ट नसून अद्याप तेथे प्रादेशिक/विकास योजनेचा कोणताही प्रस्ताव मंजूर नाही. त्यामूळे त्या ठिकाणी ब व क वर्ग नगरपरिषदांसाठीच्या मंजूर प्रमाणित विकास नियंत्रण नियमावलीनूसार सद्यस्थितीत विकास वापर अनुज्ञेय आहे.

मौजे शहापूर, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं./ग.नं.९२/१ क्षेत्र ४१५०.०० चौ.मी. पैकी ताब्यात नसलेले क्षेत्र १०१.६६ चौ.मी. वगळून उर्वरीत क्षेत्र ४०४८.३४ चौ.मी. या जागेवर समूह निवास पध्दतीने रहिवास प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी व बांधकाम नकाशास मंजूरीची शिफारस सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांनी त्यांचेकडील जा.क्र.बिशेप/ बांप/मौ.शहापूर/ता.शहापूर/ससंठाणे/२३७५ दि.३०/०९/२०१३ अन्वये शिफारस केली आहे.

त्या अर्थी, मी जिल्हाधिकारी ठाणे मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन याद्वारे मौजे शहापूर, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं./ग.नं.९२/१ क्षेत्र ४१५०.०० चौ.मी. पैकी ताब्यात नसलेले क्षेत्र १०१.६६ चौ.मी. वगळून उर्वरीत क्षेत्र ४०४८.३४ चौ.मी. या जमिनीस गांव न.नं. ७/१२ चे कब्जेदार सदरी दाखल असलेल्या श्री.सुधीर दत्तात्रेय तेलवणे यांना सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेकडील मंजूर नकाशानूसार जागेवर समूह निवास पध्दतीने रहिवास प्रयोजनासाठी अकृषिक परवानगी व बांधकाम नकाशास खालील अटी व शर्तीवर परवानगी (अनुज्ञा) देण्यात येत आहे.

<u>त्या शर्ती अशा :-</u>

१. ही परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम,१९६६ व त्या खाली केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यात आलेली आहे.

२. प्रश्नांधिन जागेची मोजणी ३ महिन्याचे आत करुन घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील

३. जागेवर खुले क्षेत्र व रस्ते यांचे क्षेत्र दर्शविणारा फलक लावणे अर्जदार यांचे बंधनकारक राहील.

४. प्रस्तावित समुह गृहबांधणी योजनेमध्ये खालीलप्रमाणे विकसन प्रस्तावित करण्यात आलेले आहे.

| अ. क्र. | भूखंडाचे एकूण क्षेत्र | खुली जागा | प्रस्तावित इमारती | एकूण बांधकाम क्षेत्र | प्रस्तावित वापर |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४१५०.०० चौ.मी. | ४१०.०० चौ.मी. | अंशत: तळ + अंशत: स्टिल्ट + ४ मजल्याच्या २ इमारती प्रस्तावित केलेल्या आहेत. | ३०२९.२२ चौ.मी. | रहिवास |

५. रेखांकनामध्ये प्रस्तावित केलेल्या रहिवास वापराच्या इमारती अंशत: तळ + अंशत: स्टिल्ट + ४ मजल्याच्या व १४.८५ मी. उंचीच्या मर्यादेपर्यंत ठेवणेबाबत मा.उपसंचालक नगररचना, कोकण विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.मौजे शहापूर/ता.शहापूर/उसंकोवि/११५७ दि.२४/५/२०१२ अन्वये शिथीलता दिलेली आहे. सदर पत्रातील अटी व शर्तीचे पालन करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

६. प्रथमत: रेखांकन प्रस्तावाप्रमाणे जागेवर भूखंड, रस्ते, खुली जागेची प्रत्यक्ष जागेवर प्रथमत: विस्तृत आखणी करुन ती उपअधिक्षक भूमी अभिलेख, शहापूर यांचेकडून मोजणी करुन घेण्यात यावी. आखणी करीत असताना सभोवतालील मंजूर अभिन्यासातील रस्ते व हद्दी यांचेशी योग्य रीतीने समन्वय साधणे आवश्यक आहे. तसेच प्रत्यक्ष मोजणीचे वेळी विषयाधिन जागेचे एकूण क्षेत्रामध्ये तसेच नियोजित भूखंडाचे क्षेत्रामध्ये तफावत आढळल्यास अभिन्यास दुरुस्त करुन अभिलेखाच्या दुरुस्तीसह सुधारीत मंजूरी घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील. त्याशिवाय जागेवर कोणत्याही प्रकारचा विकास करता येणार नाही.

७. विषयाधिन जागेवर कोणतेही विद्यमान रस्ते असल्यास सदर रस्त्याशी प्रस्तावित रेखांकनातील रस्त्यांशी समन्वय साधणे तसेच एकरुपता साधणे आवश्यक आहे. त्यामध्ये फरक पडत असल्यास त्याप्रमाणे सुधारित परवानगी घेणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

८. विषयांकित जागेचा प्रत्यक्ष वापर सुरु करणेपूर्वी प्रस्तावाखालील जागेतील रस्ते त्याच्या गटारासह वाहतुकीस योग्य होतील असे पक्क्या स्वरुपात बांधण्यात यावेत व त्याची रुंदी मंजूर नकाशाप्रमाणे ठेवण्यात यावी.

९. रेखांकनातील नियोजित भूखंडाची/रेखांकनाखालील जागेची पुढील कोणतेही उपविभागणी अवैध ठरेल. त्यातील कोणत्याही एका भागाच्या सुधारित विकासासाठी स्वतंत्रपणे विचार करता येणार नाही.

१०. रेखांकनातील रस्ते जर शेजारील जागांना लागून असतील तर अशा शेजारील जागांच्या संभाव्य रेखांकनामधील रस्त्यांना ते जोडण्यासाठी व वापरण्यासाठी परवानगी द्यावी लागेल.

११. मंजूर रेखांकनास अगर प्रत्यक्ष बांधकामात पूर्व परवानगीशिवाय कोणताही बदल करण्यात येवू नये.

१२. जागेच्या मालकी हक्काबाबत व इतर हक्काबाबत भविष्यात कोणताही वाद उद्‌भवल्यास त्याचे निराकरण करण्याची जबाबदारी अर्जदार/विकासक यांचेवर राहील.

१३. संदर्भित जागेचे क्षेत्र, स्थान, आकार, वापर वहिवाट, भोगवटादार, भाडेकरु, मालकी हक्काबाबत काही तक्रारी असल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांचेवर राहील. तसेच लगतच्या भूखंडधारकांच्या काही तक्रारी असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदारावर बंधनकारक राहील.

१४. नियोजित रेखांकनाखालील जागेतील सांडपाणी अथवा भूपृष्ठीत पाणी वाहून नेण्यासाठी जे मार्ग असतील ते अबाधित ठेवावे लागतील अथवा त्यांचा इतरांना त्रास होणार नाही अशा रितीने बंदोबस्त करणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

१५. नियोजित इमारतीच्या वापरासाठी पाण्याची सोय तसेच सांडपाण्याची व मैला निर्मूलनाची व्यवस्था प्रत्यक्ष वापरापूर्वी तशी पर्यायी व्यवस्था उपलब्ध नसल्यास इमारतीच्या वापरापूर्वी अर्जदाराने करणे आवश्यक आहे.

१६. विषयाधिन जागेवरील अंतर्गत रस्ते व खुली जागा ही विकसित करुन ते कायमस्वरुपी देखभालीसाठी संबंधित नियोजन प्राधिकरण/स्थानिक प्राधिकरणास नाममात्र रु.१/- किमतीस हस्तांतरीत करावेत.

१७. विषयाधिन जागेच्या हद्दीबाबत काही तक्रारी असल्यास त्याची सर्व जबाबदारी अर्जदारांवर राहील.

१८. नियोजित बांधकामात मंजुरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१९. प्रस्तावासोबत प्राप्त कागदपत्रांच्या विधीग्राहयतेबाबत व खरेपणाबाबत जमिन मालक/विकास अधिकारपत्रधारक वास्तुविशारद/सल्लागार अभियंता इ. जबाबदार राहतील.

२०. नियोजित बांधकामापासून पुढील,मागील व बाजूची अंतरे प्रत्यक्ष जागेवर मंजूरीप्रमाणे ठेवण्यात यावी.

२१. प्रस्तावित इमारतीचे बांधकाम इमारत क्र.१ व इमारत क्र.२ चे बांधकाम भागशः स्टिल्ट/भागशः तळ + ४ मजल्याच्या मर्यादेत करणे आवश्यक आहे.

२२. बाल्कनी बंदिस्त करता येणार नाही.

२३. स्टिल्टची उंची कमाल २.२० मी. ठेवण्यात यावी. स्टिल्टचा वापर केवळ पार्किंगसाठी करण्यात यावा.

२४. उक्त जमिनीवर अनधिकृत बांधकामे झालेले असल्यास ते स्वखर्चाने काढून टाकणेची जबाबदारी अर्जदाराची/विकासकर्त्याची राहील.

२५. प्रस्तावाखालील जागेवरून विद्यमान स्थितीत विद्युत वाहीनी जात असल्यास उक्त विद्युत वाहीनीच्या क्षमतेच्या अनूषंगाने आवश्यक ते सामासिक अंतर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर सोडणे ही अर्जदाराची जबाबदारी राहील.

२६. विषयाधिन जागेवरील बांधकामाचे मंजूर नकाशाप्रमाणे कार्यान्वयन,बांधकाम साहित्याची गुणवत्ता व दर्जा, प्रस्तावित इमारतीचे आर.सी.सी डिझाईन, अग्निशमन व्यवस्था इ. बाबत जमीन मालक/ विकासकर्ता/वास्तूविशारद/सल्लागार अभियंता/ स्ट्रक्चरल अभियंता यांची जबाबदारी राहील.

२७. विषयांकित जागेवरील बांधकाम करताना आय.एस.१३९२०-१९९३ भूकंपरोधक आर.सी.सी. डिझाईननुसार बांधकाम घटकांचे नियोजन अर्हताप्राप्त नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर यांचेकडून करुन घेणे आवश्यक असून त्यांचे देखरेखीखाली नियोजित इमारतींचे बाधकाम पूर्ण करणे अर्जदार/विकासकर्ता यांचेवर बंधनकारक राहील.

२८. सदरहू प्रस्तावास मंजूरी देणेपूर्वी नियोजित बांधकामामूळे/विकसनामुळे/भूखंडावर असलेल्या कोणत्याही वहिवाटीचे व हक्काचा भंग होणार नाही, याची जबाबदारी अर्जदार/जमिन मालक यांची राहील.

२९. पर्यावरण विभागाच्या धोरणानूसार पर्यावरण अनुज्ञेयता (Enviornment Clearance) प्राप्त करुन घेणे अर्जदार/विकासक यांचेवर बंधनकारक राहील.

३०. रेखांकन/बांधकामासाठी पोहच रस्ता तसेच अंतर्गत रस्ता व इतर सोयी सुविधा जसे जलनिस्सारण, विषयांकित मलनिस्सारण व पाणी पुरवठा इ. सर्व बाबींचा विकास अर्जदार यांनी स्वखर्चाने पूर्ण करणे बंधनकारक राहील. त्याशिवाय नियोजित वापर सुरु करता येणार नाही.

३१. महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम-४८ अन्वये सदरची बांधकाम परवानगी दिलेल्या तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल. नंतर पुढील वर्षासाठी अर्जदार यांनी योग्य त्या कारणासहीत नियोजन प्राधिकरणाकडे विनंती अर्ज करुन परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशा प्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्षे करता येईल. तसेच वैध मुदतीत बांधकाम पुर्ण केले नसतील तर नवीन परवानगी घ्यावी लागेल, नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांचा व नियोजित विकास आराखडयाच्या अनुषंगाने छाननी करण्यात येईल व ती बाब अर्जदार/जमिन मालक यांचेवर बंधनकारक राहील.

३२. शासनाचे नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र.डी.सी.आर.१०९४/२८२९/यु.डी-११, दि.१९/०९/१९९५ अन्वये सदरहू इमारतीवर सोलर वॉटर हिटींग सिस्टीम कार्यान्वित करणे आवश्यक आहे.

३३. शासनाचे नगर विकास विभागाकडील परिपत्रक क्र. टिपीबी.४३२००/२१३३/सीआर-२३०/ ०१/ युडी-११, दि.१०/०३/२००५ अन्वये सदरहू इमारतीवर रेन वॉटर हार्वेस्टींग सिस्टीम कार्यान्वित करणे आवश्यक राहील.

३४. प्रस्तावित जागेमध्ये पायाभूत सुविधांची पुरेशी तरतूद करणे अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक आहे.

३५. १:५ पेक्षा जास्त तीव्र उतारावर बांधकाम अनुज्ञेय होणार नाही.

३६. अनुज्ञाग्राही व्यक्तीने (ग्रँटीने) अशा जमीनीचा वापर व त्यावरील इमारतीच्या आणि किंवा अन्य बांधकामाचा उपयोग उक्त जमिनीचा ज्या प्रयोजनार्थ उपयोग करण्यास परवानगी देण्यात आली असेल त्या प्रयोजनार्थ केवळ केला पाहिजे आणि त्याने अशी जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा अशी इमारत यांचा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून तशा अर्थाची आगाऊ लेखी परवानगी मिळविल्याशिवाय वापर करता कामा नये. इमारतीच्या वापरावरुन जमिनीचा वापर ठरविण्यांत येईल.

३७.अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमिनीचे बिगरशेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यास ज्या दिनांकापासून सुरुवात केली असेल किंवा ज्या दिनांकास त्याने अशा जमिनीच्या वापरात बदल केला असेल तर तो दिनांक त्याने एक महिन्याच्या आत तलाठयामार्फत शहापूर तहसिलदारास कळविले पाहिजे जर तो असे करण्यास चुकेल तर महाराष्ट्र जमीन महसूल जमिनीच्या वापरात बदल व बिगरशेतकी आकारणी नियम १९६९ मधील नियम ६ अन्वये त्यांच्यावर कार्यवाही करण्यास असा अनुज्ञाग्राही पात्र ठरेल.

३८. अशा जमिनीचा त्या प्रयोजनार्थ वापर करण्यांस अनुज्ञाग्राहीस परवानगी देण्यांत आली असेल त्या प्रयोजनार्थ वापर करण्यांस प्रारंभ करण्याच्या दिनांकापासून सदर अनुज्ञाग्राहीने त्या जमीनीच्या संबंधात दर चौ.मी. मागे रु.०.१० पैसे या दराने बिगर शेतकी आकारणी दिली पाहिजे किंवा परवानगीच्या तारखेच्या पूर्वलक्षी प्रभावाने अथवा त्यानंतर अंमलात येणारे बिनशेती दराने बिनशेती आकार देणे बंधनकारक राहील. अशा जमिनीच्या वापरात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यांत आला तर त्या प्रसंगी निराळया दराने बिगर शेतकी आकारणीच्या हमीची मुदत अजून समाप्त व्हावयाची आहे ही गोष्ट विचारात घेण्यात येणार नाही.

३९. या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे अनुज्ञाग्राही व्यक्तीने उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये असा अनुज्ञाग्राही ज्या कोणत्याही शास्तीस पात्र ठरेल, त्या शास्तीस बाधा न येऊ देता जिल्हाधिकारी, ठाणे हे निर्दिष्ट करतील असा दंड आणि आकारणी भरल्यानंतर उक्त जमीन किंवा भूखंड अर्जदाराच्या ताब्यात राहू देण्याचा अधिकार असेल.

४०. सदर जमिनीच्या रेखांकन परवानगीनूसार बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्राहीने अशा जमिनीवर या कार्यालयाकडून अकृषिक बांधकाम परवानगी घेऊनच आवश्यक ती इमारत बांधली पाहिजे. अन्यथा सदरहू आदेश रद्द समजण्यात येईल व अनुज्ञाग्राही यांना अकृषिक परवानगीसाठी नव्याने अर्ज सादर करावा लागेल.

४१. दिलेली ही परवानगी मुंबई कुळवहिवाट व शेती जमीन अधिनियम,१९४८, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ इ. सारख्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचे कोणतेही उपबंध प्रकरणाच्या अन्य संबंधित बाबींच्या बाबतीत लागू होतील, त्या उपबंधांच्या अधीन असेल.

४२. प्रश्नांधिन जमिनीचे कामी भविष्यात जमीन मालकीबाबत वाद निर्माण झाल्यास व अन्य कोणी त्याबाबत हक्क सिध्द केल्यास, सदरची अकृषिक परवानगी एकतर्फी रद्द होणेस पात्र राहील.

४३. सदरहू जमीन भविष्यात भूसंपादनात आढळून आल्यास किंवा संपादन केले गेल्यास सदर आदेश निर्गमित केलेल्या दिनांकापासून रद्द होतील.

४४. अनुज्ञाग्राही यांनी बिगरशेतकी आकारणीच्या पाचपट रक्कम रु. २०७५/- (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार पंच्याहत्तर मात्र) रुपांतरीत कर (कन्व्हर्शन टॅक्स) रजिस्टर चलन क्र.२०३/२०१४ तसेच स्टेट बँक शाखा, ठाणे यांचेकडील चलन क्र.००१७६ दि.२५/०४/२०१४ अन्वये सरकार जमा केली आहे.

४५. सदर जागेची अति तातडीचे मोजणी फि रक्कम रुपये ३०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन हजार मात्र) रजिस्टर चलन क्रमांक १६६/२०१४ तसेच स्टेट बँक शाखा, ठाणे यांचेकडील क्र.००१७५ दि.२५/०४/२०१४ अन्वये शासन जमा केली आहे.

४६. महाराष्ट्र चेंबर्स ऑफ हाऊसिंग विरुध्द महाराष्ट्र शासन या मा. उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.६७०२/२०११ मधील मा. न्यायालयाचे अंतरिम स्थगितीबाबत शासनाचे महसूल व वन विभागाचे पत्र क्र.गौखनि-१०/२०११/प्र.क्र.६१८/ख दि.१७/११/२०११ मधील सूचनांनूसार मा.न्यायालयाचे अंतिम आदेशास अधीन राहून सदर परवानगी देण्यात आली असून मा. उच्च न्यायालय/शासन याबाबतीत जे निर्णय/आदेश देतील ते अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

४७. वरील अटी व शर्तीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही या परवानगीच्या तरतूदी विरुध्द जाऊन कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभे करण्यात आले असेल किंवा तरतुदी विरुध्द या इमारतीच्या किंवा बांधकामाचा वापर करण्यात आला असेल तर विनिर्दिष्ट मुदतीच्या आत अशा रितीने उभारलेली इमारत काढून टाकण्याविषयी किंवा तीत फेरबदल करण्याविषयी जिल्हाधिकारी ठाणे यांनी निर्देश देणे विधी संमत असेल तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांना अशी इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्याचे किंवा त्यात फेरबदल करण्याचे काम करुन घेण्याचा किंवा त्या प्रित्यर्थ आलेला खर्च अनुज्ञाग्राही व्यक्तीकडून जमिन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल करुन घेण्याचा अधिकार असेल.

४८. अनुज्ञाग्राही यांनी सहाय्यक संचालक नगररचना, ठाणे यांचेकडील रेखांकन नकाशा व्यतिरिक्त जादा भूखंड केल्यास अगर भूखंडामध्ये बदल करुन जादा भूखंड पाडल्यास अनुज्ञाग्राही हे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ अन्वये फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यास पात्र राहतील.

४९. विषयांकित जमिनीचा फेरफार क्र.१२९१ बाबत तसेच वारसांबाबत काही वाद उद्भवल्यास त्याचे सर्वस्वी निराकरण करणेची जबाबदारी अर्जदार यांची राहील. तसेच सदरचे अकृषिक परवानगी आदेश आपोआपच रद्द होतील.

५०. या बिनशेती आदेशान्वये जमिनीचे फक्त कृषिक प्रयोजनाकडून अकृषिक प्रयोजनाकडे रुपांतरण करणेत येत असून मालकी हक्कामध्ये कोणताही बदल करणेंत येत नाही. सदरचे आदेश म्हणजे मालकी हक्काचे प्रमाणपत्र नाही. प्रश्नांकित जमिनीचे मालकी हक्काबाबत भविष्यात वाद उद्भवल्यास किंवा न्यायालयात जमिनीचे मालकी हक्काबाबत बदल झाल्यास अकृषिक परवानगी एकतर्फी रद्द होण्यास अर्जदार हे पात्र राहतील.

५१. अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व कागदपत्रे खोटी किंवा दिशाभूल करणारी असल्यास सदर परवानगी रद्द समजण्यात येईल व त्यास अर्जदार, मालक व वास्तूविशारद हे सर्वस्वी जबाबदार राहतील.

५२. वरील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास सदरची अकृषिक व बांधकाम परवानगी रद्द होईल.

सही/--
(पी.वेलरासू)
जिल्हाधिकारी ठाणे

प्रति,
श्री.सुधीर दत्तात्रेय तेलवणे
रा.गोठेघर, ता.शहापूर, जि.ठाणे

आदेश निर्गमित केले

जिल्हाधिकारी ठाणे करिता